# प्रेस नोट

## “नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षकांची अवैध शस्त्रधारकांविरुध्द धडाकेबाज कारवाई”

नजीकच्या काळामध्ये नाशिक परिक्षेत्रातील अहमदनगर शहरात तसेच जामखेड, जि.अहमदनगर या ठिकाणी विनापरवाना अवैध अग्नीशस्त्रांचा वापर करुन, युवकांच्या हत्या केल्याच्या २ घटना घडलेल्या होत्या. अग्नीशस्त्रांचा वापर करुन सलग घडलेल्या २ हत्येच्या घटनांची श्री.विनय कुमार चौबे, विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र यांनी गंभीरतेने दखल घेत परिक्षेत्रातील अहमदनगर, जळगांव, नाशिक ग्रामीण, धुळे व नंदूरबार या जिल्हयांमध्ये विनापरवाना व बेकायदा पिस्तुल, गावठी कट्टे, घातक शस्त्रे बाळगणाऱ्या गुन्हेगारांविरुध्द कारवाई करणेसाठी सर्व पोलीस अधीक्षकांना तातडीने आदेश देवून, दि.३/५/२०१८ पासून या सर्व जिल्हयांमध्ये विशेष मोहीम राबविण्याची धडाकेबाज कारवाई सुरु केली आहे. या मोहीमेत जिल्हयांमधील अपर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, स्थानिक गुन्हे शाखा व सर्व पोलीस ठाणे स्तरांवर विशेष पथकांची निर्मीती करुन, त्यांचेव्दारे अवैध शस्त्रांविरुध्दच्या कारवाईला सुरुवात करण्यात आली. तसेच मोहीम यशस्वी होणेकरीता व जनतेच्या प्रतिसादाकरीता अवैध शस्त्रधारकांची गोपनीय माहिती देणाऱ्यांना कारवाईच्या स्वरुपानुसार २५,०००/- रुपयांपर्यंतचे बक्षीस देखील जाहीर केलेले आहे.

या मोहीमेची आजपावेतोची फलनिष्पत्ती पाहता, दि.३/५/२०१८ पासून आजपावेतो नाशिक परिक्षेत्रातील अहमदनगर, जळगांव, नाशिक ग्रामीण, धुळे व नंदूरबार या जिल्हयांमध्ये अवैध शस्त्रे वापरणाऱ्यांविरुध्द धडाकेबाज कारवाई केली असुन, मोहीमेच्या थोडयाच कालावधीत नाशिक परिक्षेत्रात अवैध शस्त्रांबाबत एकूण ६१ गुन्हे दाखल करुन, त्यात ७८ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. विशेष कामगिरी म्हणजे अटक आरोपींकडून ८ पिस्टल, १८ गावठी कट्टे, २७ काडतुस, ४२ तलवार, ३ कोयते, ४ चॉपर, ५ चाकु, १ सुरा, १ कटर, १ कुऱ्हाड, १ गुप्ती व ४ वाहने असे मोठया प्रमाणावर बेकायदेशीर शस्त्रे जप्तीच्या कारवाईत पोलीसांच्या अथक प्रयत्नांना यश आलेले आहे.

| जिल्हा | अवैध शस्त्रांबाबत दाखल गुन्हे | विनापरवाना, बेकायदा कब्जात पिस्तुल, गावठी कट्टे व इतर घातक शस्त्रे बाळगणारे अटक आरोपी | अटक आरोपींकडून जप्त करण्यात आलेले एकुण पिस्तुल,गावठी कट्टे/ रिव्हॉल्वर,काडतुस व इतर घातक शस्त्रे |
|---|---|---|---|
| अहमदनगर | १८ | ३२ | ४ पिस्टल, ५गावठी कट्टे, १३काडतूस १० तलवार, २ चाकु, ४ वाहने, |
| जळगांव | २६ | ३६ | ३ पिस्टल, ४ कट्टे, २१ काडतूस, १४ तलवार, ५ रिकामे काडतूस, २ कोयते, ४ चॉपर, १ सुरा, १कुऱ्हाड |

Scanned by CamScanner

| जिल्हा | अवैध शस्त्रांबाबत दाखल गुन्हे | विनापरवाना, बेकायदा कब्जात पिस्तुल, गावठी कट्टे व इतर घातक शस्त्रे बाळगणारे अटक आरोपी | अटक आरोपींकडून जप्त करण्यात आलेले एकुण पिस्तुल,गावठी कट्टे/ रिव्हॉल्वर,काडतुस व इतर घातक शस्त्रे |
|---|---|---|---|
| नाशिक ग्रा. | ११ | ११ | ३ गावठी कट्टे, २ काडतुस, ९ तलवार, २ कोयते, ३ चाकु |
| धुळे | ११ | ११ | ७ गावठी कट्टे, १ पिस्टल, १० काडतुस, ८ तलवार, १ सुरा, १ कटर, १ गुप्ती |
| नंदूरबार | ३ | ४ | २ पिस्टल, ४ तलवार |
| **एकूण नाशिक परिक्षेत्र** | **६९** | **९४** | **१० पिस्टल, १९ कट्टे, ५४ काडतुस, ४५ तलवार, ४ कोयते, ४ चॉपर, ५ चाकु, २ सुरे, १ कटर, १ कुऱ्हाड, १ गुप्ती, ४ वाहने, ५ रिकामे काडतूस, १ डबल बोर बंदुक** |

नाशिक परिक्षेत्रीय पोलीसांची यशस्वीरित्या सुरु असलेल्या मोहीमेत जनतेने अधिक प्रतिसाद देणेकरीता याव्दारे पुन्हा अवाहन करण्यात येते की, आपणांस विनापरवाना, बेकायदा कब्जात पिस्तुल, गावठी कट्टे यासारखे शस्त्र बाळगत असेल अशा व्यक्तींची माहिती असल्यास सदर माहिती खाली दिलेल्या संबंधीत जिल्हा पोलीस अधीक्षकांचे संपर्क क्रमांकावर कृपया संपर्क करुन, Message, whatsapp message पाठवून अथवा ई-मेल आयडीवर कळवावी. अशी माहिती देणाऱ्या इसमाचे/बातमीदाराचे नांव अत्यंत गोपनीय ठेवण्याची पूर्णत: दक्षता घेणेत आलेली आहे. तसेच ज्या इसमांनी गुप्त माहिती दिली असेल त्यांना गुप्त माहितीनुसार यशस्वी कारवाई झालेनंतर करण्यात आलेल्या कारवाईच्या स्वरुपानुसार रु.२५,०००/- पर्यंत प्रोत्साहनपर योग्य रोख बक्षीस देखील देणेत येणार आहे.

**संपर्क-**

| जिल्हा | पोलीस अधीक्षक | मोबाईल क्रमांक | ई-मेल |
|---|---|---|---|
| अहमदनगर | श्री. रंजनकुमार शर्मा | ८८८८३१०००० | sp.ahmednagar@mahapolice.gov.in |
| जळगांव | श्री. दत्तात्रय कराळे | ९६६४४९८६६६ | sp.jalgaon@mahapolice.gov.in |
| नाशिक ग्रामीण | श्री. संजय दराडे | ९८२३१३३९१० | sp.nashik.r@mahapolice.gov.in |
| धुळे | श्री. एम. रामकुमार | ८९७५२८८०३६ | sp.dhule@mahapolice.gov.in |
| नंदूरबार | श्री. संजय पाटील | ९९२२०६७१११ | sp.nandurbar@mahapolice.gov.in |

दिनांक- १५/५/२०१८

ठिकाण- नाशिक

Scanned by CamScanner